# नियमित दिवाणी दावा क्र. ३३३/२०१८ मधील निशाणी क्र.०५ वरील आदेश

CNR : MHAH23-000784-2018

**१.** वादींनी दावा मिळकतीची मोजणी करुन मिळण्याकरिता उप अधिक्षक, भूमी अभिलेख, श्रीगोंदा यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणूक करावी यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

**२.** वादींच्या कथनानुसार, दावा मिळकत मौजे बेलवंडी बुा, ता. श्रीगोंदा येथील गट क्र.१०१३ पैकी २ हे ८५ आर ही त्यांच्या वडिलोपार्जित शेतजमीन मिळकत आहे. वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचेविरुध्द जाहिर ठरावासाठी दावा दाखल केला होता व तो दि.२२/०४/२०१८ रोजीच्या तडजोडीप्रमाणे निकाली काढण्यात आला. सदर तडजोड हुकूमनाम्यास अनुसरुन दावा मिळकतीच्या उत्तरेस प्रतिवादी क्र.१ ते ३ व १४ यांच्या याच गट क्रमांकामधील ४ हे ८५ आर क्षेत्र असुन दावा मिळकतीच्या दक्षिणेस याच गट क्रमांकापैकी प्रतिवादी क्र.५ ते १३ यांचे २ हेक्टर क्षेत्र आहे. वादी यांना जुलै २०१८ मध्ये दावा मिळकतीच्या क्षेत्र कमी असल्याचे प्रतिवादींनी अतिक्रमण केल्याचे निर्देशनास आले. त्यामुळे त्यांनी मिळकतीची मोजणी करण्याकरीता उप अधिक्षक, भूमि अभिलेख श्रीगोंदा यांचेकडे मोजणीबाबत चौकशी केली असता त्यांनी पोटहिस्सेची मोजणी करण्याकरीता इतर खातेदारांची व सहहिस्सेदारांची संमती आणणेस सांगितले. त्यामुळे वादींनी प्रतिवादींकडे मोजणीसाठी विचारणा केली असता त्यांनी मोजणीस नकार दिला. त्यामुळे वादींनी प्रस्तुतचा दावा अंतर्गत हिश्याची मोजणी करीता व दावा मिळकतीच्या हद्दी कायम करुन मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**३.** प्रतिवादी क्र.१ ते १४ हे हजर झाले नाहीत म्हणुन त्यांना दाव्याचे समंन्सची बजावणी होवुनसुध्दा ते दाव्यात हजर झाले नाहीत म्हणुन त्यांच्याविरुध्द एकतर्फा आदेश पारीत करण्यात आला.

**४.** प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीची अंतर्गत मोजणी होवुन हद्दी कायम करण्याकरीता दाखल केलेला आहे. वादींच्या कथनांवरुन असे दिसून येते की, सर्व वादी व प्रतिवादी यांच्या मिळकती या एकाच गट नंबरमध्ये असल्यामुळे त्यांच्यामध्ये हद्दीवरुन वाद आहेत. त्यामुळे दोन्ही पक्षांमध्ये मोजणी होवून त्याबाबतचा नकाशा अभिलेखावर येणे गरजेचे आहे. त्यामुळे अंतिम निकाल देण्यास न्यायालयास मदत होईल. दोन्ही पक्षाच्या क्षेत्रांची मोजणी करुन त्यामधील वादी व प्रतिवादी यांच्या वहिवाटीप्रमाणे नकाशा तयार झाल्यास दाव्याचा अंतिम निकाल देतेवेळी मदत होईल. तसेच प्रस्तुतची मोजणी करण्यासाठी उप अधिक्षक भुमि अभिलेख श्रीगोंदा यांचे

कार्यालयातील सर्व्हेअर यांची नेमणूक करणे योग्य राहिल. सबब, अर्ज मंजूर होणेस पात्र असून पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे :-

**-: <u>आ दे श</u> :-**

१. वादींचा निशाणी क्र.५ चा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. उपअधिक्षक, भूमी अभिलेख, श्रीगोंदा यांचे कार्यालयातील सर्व्हेअर यांची कोर्ट कमिशनर म्हणुन दावा मिळकतीची मोजणी करणेसाठी नियुक्ती करण्यात येते.

३. उपअधिक्षक, भूमि अभिलेख, श्रीगोंदा यांचे कार्यालयातील सर्व्हेअर यांची कोर्ट कमिशनर म्हणून नेमणुक करण्यात येते व त्यांना मौजे बेलवंडी बु॥, ता.श्रीगोंदा जि.अहमदनगर येथील संपुर्ण गट क्र.१०१३ ची मोजणी करुन सर्व हिस्सेदारांच्या हद्दी दाखवाव्यात व ते मोजणी नकाशामध्ये नमुद करावे व तेथील वस्तुस्थितीबाबत पंचनामा करून त्याप्रमाणे अहवाल सादर करावा.

४. वादींनी कोर्ट कमिशन बाबतची फि संबंधीत कार्यालयात १५ दिवसांच्या आत भरुन तशी पुरसिस पुढील तारखेस न्यायालयात सादर करावयाची आहे अन्यथा अर्ज नामंजूर समजण्यात येईल.

५. कोर्ट कमिशनर यांनी कोर्ट कमिशन कामाचे सर्व तरतुदींचे पालन करावयाचे आहे आणि वादींनी कोर्ट कमिशनची फी भरल्यापासून मोजणीचा अहवाल तीन महिन्याच्या आत या न्यायालयास सादर करावयाचा आहे.

६. कोर्ट कमिशन रिट पाठविण्यात यावी.

सही/-

**( पंकज खे. अहिर )**

दिनांक : ०२/०४/२०१९.

सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
श्रीगोंदा, जि. अहमदनगर